ऐकीव माहिती आणि सत्य परिस्थिती ह्यात जमीन अस्मानाचा फरक कशामुळे पडतो तेच कळत नाही. लोकांचा दृष्टिकोन इतका वेगवेगळा कसा काय असू शकतो. काही कळत नाही.

मला ओंकारेश्वर ला जायच्या आधी अशी माहिती कळली की सध्याच्या काळात तिकडे जबर गर्दी झाली आहे, लोकांना खायला प्यायला मिळत नाही आहे... (म्हणून तू जाऊ नये) मी तर 5 दिवसात जायचे ठरवले. मनाशी विचार केला 5 दिवसात मला रेल्वे चे तिकीट कसे काय बुवा मिळाले?

आदल्या दिवशी तर माझ्या बरोबर जाणारे चा रात्री उशिरा फोन आला, बहुतेक कँसल करावे लागेल.. तू काय ठरविले आहे... Ultimately डोक्यात तिडीक आली आणि मी उत्तर दिले, काय वाट्टेल ते होऊदे, ज्यांना यायचे आहे ते या... मी जाणार म्हणजे जाणार... हाच turning point ठरला.. माझ्या बरोबरी च्या लोकांनी पण ठरवले.. असे असेल तर आम्ही सुद्धा येऊ..

अशी सगळी झिग झिग करून इंदौर ला पोहोचलो. तिथून पुढे ओमकारेश्वर.

कन्या पूजन /भोजन

आणि नर्मदा पूजन करून निघालो मोरटक्का ला (12km) जायला.

वाटेत महा मृत्यूंजय मंत्र चा अखंड जप करत असणारा एक आश्रम आहे.

मी विचारले हे करण्या चा उद्देश काय आहे?

तर आधी सांगितले सर्वांनाच सुख शांती मिळू दे.. मग म्हणाले corona चे संकट दूर व्हावे म्हणून..

नंतर हळूच म्हणाले

मोदींच्या सुरक्षित आयुष्यासाठी...

Day 2 मोरटक्का toksar रावेर खेडी, बकावा, मरदाना.

वाटेत खूप वेग वेगले लोक भेटत आहेत.

काही बाल ब्रह्मचारी, काही अर्धा संसार सोडून आलेले, काही संसार सुरू करायच्या आधी च कंटाळलेले

प्रत्येकाची कहानी वेगली

पण ह्या सर्वांनाच शहरात रूढ पद्धतिने रहायचे नाही ये.

अशीच एक वल्ली भेटली

TI महाराज

(ठाणेदार IN CHARGE)

हा तरुण मुलगा दिल्ली पोलिस मध्ये जॉईन झाला, system मध्ये राहणे खूप अवघड वाटायला लागले. एका विधवा महिलेची मदत (क्रिमिनल केस) करताना लोक त्याचीच कुचेष्टा करायला लागले. त्याचा वीट आल्याने नोकरी सोडून सरळ ईथेच येऊन राहिला.

मला म्हणतो त्याला सत्य कळून चुकले आहे की त्याच्या कडे नोकरी, पैसा असेल तरच त्याच्या वर कोणी प्रेम करू शकते, म्हणजे एक अर्थी हा एक दिखावा च आहे, जो त्याला मान्य नाही...

Day 3 मरदाना अमलता, तीग्री, लेपा पुनर्वास

आज प्रथम पूर्ण प्रवास एकटीने केला, रस्ता विचारत विचारात चालत राहिले. मध्ये एक छोटी नदी लागली तेव्हा बुचकळ्यात पडले. ही नदी पार करून जायचे आहे की कसे? शेवटी एक बकरी चरवण्यासाठी आलेल्या माणसाने नदी पार करण्याची जागा दाखवली आणि मी पुढे येऊ शकले.

आजच्या परिक्रमेचा मुख्य हेतू लेपा पुनर्वास येथील भारती ताई चा आश्रम आणि institute बघण्याचा होता.

भारती ताई स्वतः परिक्रमा करण्यासाठी येथे आल्या आणि ईथेच कायमच्या रहीवासी झाल्या. इथे त्या इथल्या मुलांसाठी शाळा आणि वसतिगृह चालवतात, त्यांना life skill building ची कामे शिकवतात जसे cooking, गोपालन, शेती, plumbing, solar energy, solar dried products आणि त्याचे मार्केटिंग वगैरे. Recreation म्हणुन बऱ्याच कलांमधे ही मुले निपुण आहेत, त्यांनी शंकराचार्य च्या स्तोत्रांना चाली लावल्या आहेत, त्यांना शास्त्रीय संगीत आणि वाद्ये जसे तबला पेटी चांगली वाजवता येते. स्पोर्ट्स मध्ये विशेषत marathon मध्ये ही मुले विशेष प्रवीण आहेत. मोठ्या मुलांना computer, marketing, report writing अशी कामे सहज जमतात. एकंदरीत एक चांगली सशक्त पीढ़ी तयार होते आहे.

Day 4 लेपा, कठोरा, बडगाव

जेव्हढे अन्तर दाखवले होते त्यापेक्षा कितीतरी अन्तर जास्त होते, तरी पुढे चालत राहू असे ठरवले होते. कठोरा ला जेवण करून निघाले आणि काही घरे पार करून पुढे गेले, एक छोटीशी गल्ली दिसली उजवीकडे, ती पार करून थोडी पुढे गेले तर एक 6-7 वर्षांची मुलगी अचानकच समोर आली अन म्हणाली, दीदी आप गलत रास्ते जा रहे हैं, पीछे उस गली से जाना. काही खरे वाटेना, तेवढ्यात एक मोठा मुलगा बाइक वर आला तो सुद्धा तेच म्हणाला.. मग विश्वास बसला. त्या मुलीला म्हटले बघ तू नसतीस तर काय झाले असते माझे?

तिच्या चेहऱ्यावर फक्त एक मंद स्मितहास्य.

आता त्या गल्ली तून पुढे आले तर एक छोटी मुलगी येऊन सांगते

वो पीली झंडी देखते जाना.

पुढे गेल्यावर अचानक एक जंगल सुरू झाले, वेडीवाकड़े रस्ते, झाडी, विविध पक्षी आणि मी एकटीच.. (प्राणी नव्हते ते बरेच झाले) 😀

अशा जंगलातून पीली झंडी बघत बघत चालू पडले..

मैय्या की कृपा

असे कोणी एरव्ही म्हटले असते तर मनात हसले असते पण आज मात्र मन भरून आले.

डोळ्यात पाणी यायला लागले.

(शहरात नेमकी उलटी दिशा दाखवली असती कपटी लोकांनी)

असे तीन किमी एकटी चालले..

आणि समोर आश्रम दिसला.

तिथल्या बाबाजी ना बघून मन मोकळे करून टाकले अगदी.

तिथला परिसर अजून सुंदर वाटायला लागला. बाबाजी नी स्वतः च्या हाताने तुळस घालून चहा करून दिला.

त्या क्षणी त्या सर्वाच्या इतक्या प्रेमात पडले की पुढे जाण्याचे रद्द करून आज बड गाव ला मुक्काम.

Day 5

बडगाव, शालिवाहन, नावडीटोला, बलगावघाट, खलघाट

सुंदर सकाळी अगदी किनाऱ्यावरून परिक्रमेची सुरवात झाली, किती तरी पक्षी बघायला मिळाले, त्यानंतर जाऊन पोहोचले ते नावड़ी घाट च्या शालिवहन मंदिरात. शालिवाहन राजांनी बांधलेले हे मंदिर आणि त्याच्या बरोब्बर समोर माहेश्वर चे मंदिर दिसते. खूप प्रसन्न वाटते..

त्यानंतर सुरू होते कंटाळवाणे चालणे. दोन्ही बाजूंना केळीच्या बागा, चणे, मिरची, पण रस्त्यावर एकही झाड नाही.

अशा टळटळीत उन्हात दुपारी 1 वाजेपर्यंत चालल्यावर समोर आले दाल बाटी आणि लाडूचे जेवण sponsored by unknown marriage party..

त्या पुढचे चालणे सुरू होते चक्क मुंबई आगरा महामार्गावर..

Day 6

खलघाट चीचली कठोरा

(ग्यारह लिंगी) भोईंदा

खलघाट च्या महाराजांनी सांगितले आता ग्यारह लिंगी ला, तिथे जेवण करा, नंतर ब्राह्मणगड़ ला रात्री मुक्काम करा.

कठोरा ला पोहोचल्या वर दोघे जण आले बाइक वरून आणि म्हणाले

तुम्ही आता भोइंदा ला चला, प्रसाद घेऊन पुढे जा.

काही कळेना, हा असे का बरे सांगत आहे.

मी म्हटले मला ग्यारह लिंगी देऊळ बघायचे आहे. तर म्हणे ते पाण्यात बुडले आहे आणि पुढचा रस्ता नावे तून पार करायला लागेल, पण तुम्हाला नावाडी मिळणार नाही..

काही समजेना काय करावे.

एकदा वाटले हा त्याच्या आश्रमाचे मार्केटिंग करतो आहे.. (घाण शहरी विचार करण्याची पद्धत)

माझ्या मागे अजून तीन जण आले.

त्यांना सुद्धा ठरविता येईना काय करायचे.

मग तो माणूस म्हणाला असे करा

माताराम... मी तुम्हाला बाइक वर ग्यारह लिंगी ला घेऊन जातो आणि दाखवून आणतो, मग तुम्हीच ठरवा...

अशी झाली ग्यारह लिंगी ची सफर. तिकडे खरेच काहीच नव्हते, ना नाव, ना नावाडी..

समोरच्या बाजूचे बिल्व महादेवचे मंदिर बघून परत कठोरा ला पोहोचले. तिकडून भोइंदा.

Already 14 km चालून झाले 11 वाजे पर्यंत.

त्यानंतर

खरा प्रकार लक्षात आला.

आता ह्यावेळी सरदार सरोवर डॅम ची दारे बंद आहेत त्यामुळे backwater ची रुंदी वाढली आहे. म्हणजेच मध्य प्रदेश मधील किनाऱ्यावर चे आश्रम पाण्याखाली आले आहेत.. त्यामुळे परिक्रमेचा मार्ग सुद्धा बदलला आहे. आता परिक्रमा कर्मी चक्क इंदौर बरोड़ा highway वरून चालतात बड़वानी पर्यंत. म्हणजे ईतके दिवस लोक किनाऱ्याने चालायचे, मध्ये सुंदर वनराजीने वेढलेल्या आश्रमात साधु बाबा च्या सहवासात संध्याकाळी राहून पुढे जायचे.. आता ते पावित्र्य highway वर राहिले नाही. चक्क एका ढाब्यावर रहील्यासारखे वाटते. आज दवाना येथे संध्याकाळी मुक्काम केला, येथून पुढे 40 किमी दूर बड़वानी आहे. तेथे बस ने जाण्याचा विचार आहे कारण हाइवे वर चालण्यात काहीच मजा नाही.

Day7

आज बड़वानी ला बस ने आल्या मुळे खूप रिकामा वेळ होता. ईतर लोकांशी बोलण्यात आणि झोपून राह ताना अजिबात कंटाळा आला नाही.

थोडी विश्रांती आवश्यकच होती असे वाटले.

गेल्या 6 दिवसात मी काय काय बघितले?

Rural MP आणि बड़वानी हे शहराचे ठिकाण आहे.

नर्मदा परिक्रमा कर्मी बददल खूप आदर असतो ह्या लोकांच्या मनात.

तेवढा आदर आपल्याला वारकरी लोकांबद्दल वाटत नाही. ते जेव्हा आपल्याकड़े पैसे मागतात तेव्हा कसे तरीच वाटते. वारी साठी थोडेफार पैसे द्यावे लागतात. परिक्रमे साठी नाही. फक्त असे ऐकले आहे की शूल पानी च्या जंगलात आपले सामान उचलून न्यायचे असेल तर rs 3000 घेतात 8 दिवसांसाठी.

अंदाजे 4000 आश्रम आहेत पूर्ण रस्ता भर.

तेथे सर्वांचीच खूप प्रेमाने काळजी घेतली जाते. खाण्या पिण्याचे तर अक्षरशः लाड असतात.

येथे माणशी एक प्रमाणे सहज गायी म्हशी घराघरातून असू शकतात. इतके गोधन पाहून अचंबित व्हायला होते.

खूप मोठी शेते, त्यात छोले, मिरची, केळी, पपई, भोपळा, काकडी सारखी पिके घेतली जातात. उस फारच कमी.

इथल्या उपनद्या सुद्धा खूप मोठया आणि भरपूर पाणी असलेल्या आहेत. इतक्या सुबत्ता आणि मुबलक पाणी अणि गोधन असलेल्या प्रदेशातील माणसे प्रेमळ नसतील तर नवलच.

इथे फक्त पूर्ण दुधाचा चहा प्यायला मिळतो. त्यांना कमी दूध आणि बीन साखरेचा चहा मागितला तर त्यांचा चेहरा कडू होतो. इथे शेतकर्यांना दुधाचा लिटर मागे रु 50 भाव मिळतो. त्यामुळे पिकाचे नुकसान झाले तरी खूप फरक पडत नाही.

आज बड़वानी ला 2 कचोरी, 1 समोसा आणि 2 चहा ह्याचे बिल आले रु 35 फक्त.

बड़वानी मध्ये मी मोची शोधायला बाहेर पडले (माझ्या sack ला खालून छोटे भोक पडले होते) रस्त्यावरच्या एका छोट्या गोळ्या बिस्किट चहा विकणाऱ्या दुकानात विचारले कुठे असेल मोची तर त्याने त्याच्या घरातून बहिणीकडून sack शिवून दिली. काय म्हणावे आता. खरच स्वतः ची लाज वाटायला लागते, आपण मनातल्या मनात किती हिशोब करतो वेळ आणि पैशाचे. ह्या सर्व लोकांपैकी एक जण जरी माझ्या घरी आले तर मी कशी वागेन ह्यांच्याशी? खरेच महाराष्ट्र बाहेर UP, MP, उत्तराखंड येथे असे अनुभव वारंवार येतात.

हा असा पण भारत आहे.

Day 8

बड़वानी पीछोड़ी, भवती, अमला, बिजासन.

हा रस्ता शूल पर्णी कडे जातो.

शूल पाणी हा MP आणि महाराष्ट्र ला जोडणारे जंगल आहे. Generally राज्याच्या बॉर्डर वर आदिवासी दिसून येतात, तसेच ते येथे पण आहेत. कोरकू, बइगा, भिल्ल वगैरे. भिल्ल लोक एकलव्य ला खूप मानतात. मासेमारी करणारे कोळी तर नर्मदे चे खरे सुपुत्र.

आज शूल पाणी च्या दिशेने वाटचाल सुरू झाली. साधारण 22 km चालल्यावर भवति गावाला पोहोचलो.

तेथे समजले की वरच्या टेकडीवर रहायची आणि जेवायची सोय आहे. आता ही टेकडी चढ़ायची अजिबात हिम्मत नव्हती मग काय हनुमान मंदिरात पथारी पसरली. जेवायचे काय.... इल्ला

जवळच्या घरातून एका बाईने चहा आणून दिला, त्यात टोस्ट बुडवून खाल्ले..

मैय्या ने ठेविले तैसेची रहावे अजून काय.

आज प्रथम सातपुड्याचे दर्शन झाले.

आदिवासी आणि हिंदू अशी सरमिसळ घरे लागली तसे गाई म्हशी चे प्रमाण कमी होऊन कोंबड्या आणि बकरी जास्त दिसायला लागल्या. (just an observation)

आता प्रत्येक माणसाने 'नर्मदे हर' असे जयघोष करण्याचे कमी झाले कारण आदिवासिना नर्मदा परिक्रमा कर्मी चे काहीच सोयरसुतक नाही.

आता बघू उद्याचा दिवस काय घेऊन येतो ते.

Day 9

भवति मोरकट्टा, कुल (कुल नदी किनारी)

इथून पुढचा प्रवास सातपुडा पर्वताच्या राशि तून सुरू होतो. बहुतेक ठिकाणी अंजान वृक्ष दिसतात.एकदाचा हाइवे वर चा प्रवास संपला म्हणून हायसे वाटले.

आता एका बाजूला खाई मध्ये नर्मदा मैय्या आणि दुसऱ्या बाजूला पहाड़.

अजून काही खायला मिळालेच नव्हते. सकाळी मंदिरात दोन छोटी मुले गरम चहा घेऊन आली होती तेवढेच. एका दुकानातून दाणे आणि फुटाणे घेऊन खाल्ले. अजूनहीं मिरचीचे भजे खावेसे वाटले नाही.

तसेच पुढे चालत राहिले. ह्यापुढे मोबाइल बंद होणार होता. खर्या अर्थाने जगापासून लांब. घरी सांगून टाकले तसे.

12 वाजले तसे जेवणाची आठवण यायला लागली पण आश्रमात पोहोचायला खूप वेळ लागणार होता. पुढे चालत राहण्याशिवाय पर्यायच नव्हता.

आणि मैय्या च्या रुपात एक आदिवासी महिला दिसली. तिच्या कडे पाणी मागितले तर तिने आत चालण्यासाठी आग्रह केला. मग म्हणाली थांब चहा करते. (मनात म्हटले ठीक आहे) चहा पिऊन झाला मग म्हणाली थोडी खिचड़ी खा, कि रोटी करू? म्हटले आता रोटी नको करत बसू. थोडी खिचडी खाते. एका ताटली मध्ये खिचड़ी आणली, मग परत आत गेली आणि पळी भर तूप घेऊन आली... यशोदा मैय्या जणू..

ईतके लाड झाल्यावर उड्या मारत कुली ला पोहोचले तर काय नवल

Day 10

कुली चा आश्रम आतापर्यंतच्या आश्रमा पेक्षा खुपच वेगळा. वर डोंगरावर छोटासा आश्रम, मधोमध धूनी पेटवलेली आणि अखंड गायत्री मंत्राचा जप चालू (डिजिटल)

आज प्रथम स्वतः स्वयंपाक करण्याची वेळ आली. राजश्री ताई नी सुरेख पोळ्या केल्या. त्याबरोबर बटाटा आणि टोमॅटो चा रस्सा आणि भात.

बराच वेळ कोणी बाबा दिसेना पण एका पूर्वाश्रमीच्या मामा ने चहाचे समान आणि शिधा काढून दिला. (मामा हे एक प्रकरण आहे, नंतर सविस्तर लिहिन)

जरावेळाने बाबा आले. एकदम चटपटीत. आम्हाला सर्व सामान उचलून बाजूला ठेवायला सांगितले आणि पूर्ण जागा झाडून काढली.

मग सर्वांना बसवून प्रेमाने जेवायला वाढले.

सकाळी सर्वांच्या आधी उठून झऱ्याच्या काठी गेले आणि काठावर थोडेसे खणले आणि त्यातून येणारे गरम पाणी सर्वांना वापरायला सांगितले.

आयुष्यात प्रथमच हे बघायला मिळाले. त्याबद्दल विचारले तर म्हणे नंतर सांगेन. पुढचा आश्रम 6 किमी दूर आहे असे कळले. मग विचार केला ह्या बाबांशी बोलले पाहिजे.

त्यांच्या परवानगीने तिथे जास्त वेळ थांबायचे असे ठरले.

बाकी सर्व जण पुढे गेले आणि मी बाबा काय काय करतात ते बघत बसले. परत सर्व साफसफाई. मग धूनी, आहुति आणि मंत्र पठण. त्यात दोन तास गेले. मग चिमण्यांची चिव चिव सुरू झाली, त्यांना बाजरी दिली आणि पाणी ठेवले.

मग बागेची साफसफाई.मध्ये जाऊन मी झऱ्याच्या काठावर जाऊन कपड़े धुतले, परत गरम पाणी येते आहे का ह्याची खात्री करून घेतली.

त्यानंतर आम्ही दोघांनी आमच्यासाठी जेवण बनवले. मी डाळ (आमटी) केली आणि कणिक मळून दिली. बाबांनी चुलीवर, निखारयावर रोटी केली.

मग बराच वेळ आम्ही शहरी आणि ग्रामीण जीवनशैली मधला फरक ह्यावर बोललो. मग त्यांची गाडी आली (पुरुष प्रधान संस्कृती च्या background वर) इथल्या स्त्रिया कशा राहतात, वागतात कपड़े कसे घालतात वगैरे. आणितुम्ही बायका कशा रहता वगैरे. तुम्हाला चूल कशी पेटवायची ते पण समजत नाही..ह्या सर्वांचा

शेवट असा झाला की मी म्हटले

आता तुम्ही इंदिरा गांधी ना म्हणाल तुम्हाला रोटी पकवता येत नाही तर त्या म्हणतील मला देश चालवता येतो.

त्यानंतर सुरू झाला विषय झऱ्याच्या गरम पाण्याचा.

बाबाच्या म्हणण्यानुसार वाळवंटाच्या खालचे पाणी गरम असते..

ते कसे काय?

🤭 आपण थंड पाणी पितो आणि गरम पाणी सोडतो.

मी जर गादीवर बसले तर गादी गरम होते. 😀😀

आम्ही दोघेही उत्तराखण्ड राहलो होतो हे बोलणे आधीच झाले होते.

त्यामुळे बाबा च असे म्हणाले की असे गरम पाणी तिकडे नाही सापडत. असो.

आता पर्यंत भेटलेल्या बाबांबदद्ल मी निराळे लिहीन.

अशा सर्व गप्पा मारल्या आणि घूमसा ला जाण्यासाठी निघाले.

घूमसा हे नावाप्रमाणेच घूमत घूमत पोहोचण्याची जागा आहे.

अगदी K2S (katraj to Sinhgad) ची आठवण होते. तिकडे 17 टेकड्या क्रॉस करत असतिल तर इकडे 35 असाव्या. बोरांची झाडे पण बोर अजून कच्ची. खूप छान जंगल, टेकड्या, वरतून दिसणारी मैय्या.

येथे लखन बाबांचा आश्रम प्रसिद्ध आहे. त्याचे सध्याचे उत्तराधिकारी आहेत पुण्याचे निरंजन पवार. संपूर्ण संन्यस्त जीवन जगतात. वेद आणि गीतेचा चांगला अभ्यास आहे त्यांचा.

Day 11

घूमसा ते सेमलट

2 सन्यासी जे लहानपणी घर सोडून आले आहेत, 2 बाल सन्यासी ज्यांची घरे जवळपास आहेत पण घरची परिस्थिती बिकट आहे आणि महात्मा ज्यांचे फुलगाव ला व्यवस्थित ट्रेनिंग झाले आहे.

हया दोन बाल सन्यासी बददल विशेष आपुलकी वाटली. कोणी सांगायची गरज नाही, हया मुलांवर हे सन्यासी पण लादले गेले आहे. दुर्गम सातपुडा भागात शाळेत मास्तर रोज येत नाहीत, त्यामुळे शिक्षण यथा तथाच, आता तर लॉक डाउन चालू आहे. खरे तर इथे एकही पेशंट नाही. मी स्वतः मास्क वापरणे कधीच सोडून दिले आहे पण बड़वानी च्या लोकांच्या म्हणण्याप्रमाणे काही पेशंट आहेत, जास्त करुन धार मधून जास्त पेशंट येतात कारण इथे सुविधा आहेत. असो. इथे प्रत्येक गोष्टीचे स्पष्टीकरण मैय्या की मर्जी असेच असते, ते सर्वांच्याच सोयीचे पण आहे.

मलाही हे असे सारखे ऐकून मतपरिवर्तन होत आहे.

चालत असताना नको तेव्हा adventure आणि फोटो काढण्यात, गप्पा मारण्यात वेळ घालवल्यानंतर मला सुखरूप पोहोचवणारी मैय्या च आहे असे वाटते. किती तरी वेळा नक्की रस्ता सापडत नाही आणि अचानक कोणीतरी समोर येऊन रस्ता दाखवून जाते.

ही परिक्रमा पूर्णपणे informal, पण wel organised आहे. एकदा सकाळी निघालो की आपली security आणि जेवण्याची कोणाचीच जबाबदारी नाही, पण सर्व काही नीट पार पडते.

शूल पानी च्या जंगलात पूर्वी लूटमार, अगदी अंगावरचे कपड़े काढून घेईपर्यंत गुंडगिरी चालायची.

धरणाला पाठींबा असणारे सांगतात की ह्या लोकांना खूप पैसे मिळाले, मग त्यांनी लूटमार सोडून दिली.

इथल्या बाबांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या आश्रमात मिळणाऱ्या सेवे मुळे हे लोक जोडले गेले आणि त्यांची मानसिकता बदलली. आता हेच लोक आपण होऊन परिक्रमा कर्मी ची सेवा करतात.

ह्या मध्ये लोकल लीडर चा पण सहभाग आहेच. आता रस्त्यावर काही अंतरावर दिशा दाखवणारे marking केलेले असते. आजकाल porter घेऊन परिक्रमा करण्याची पण पद्धत सुरू झाली आहे.

जेव्हा ह्या लोकांना compensation म्हणुन पैसे मिळाले तेव्हा जे व्हायचे तेच झाले, लोकांनी दारू आणि इतर गोष्टीत पैसे उडवून टाकले. दुर्गम भागात रस्तेच नाहीत त्यामुळे चार चाकी नाही पण बाइक मात्र सर्वांकडे आहे. बराचसा भाग आता डांबरी रस्त्याने जोडला गेला आहे. पैसे उडविण्याच्या सुरस कथा ऐकायला मिळतात जसे पैज लावून 1000 रुपये च्या नोटांमधये तंबाखू घालून बिडी प्यायची. मला नेहमीच आपल्या सरकारला सांगावेसे वाटते की compensation देताना, ह्या लोकांना compulsory investment करायला लावली आणि interest चे पैसे खर्च करायला द्यावे. म्हणजे capital सुरक्षित राहील.

इथल्या आश्रमात ओपन ऑफर असते कोणाला गांजा हवा असेल तर देण्यात येईल. (मला उगाचच रिया ची आठवण झाली.)

सध्या रोज सकाळ संध्याकाळ मैय्या ची आरती, त्याबरोबर सगळीकडे भरून राहिलेला उदबत्तीचा धूर आणि रात्री जळलेला गांजा चा धूर... हे लोक सहज चालू शकतात त्याचे हे सुद्धा एक कारण असावे. सर्वांनाच मैय्या च्या कृपेची झिंग आहे.

मी सुद्धा असाच काहीसा डोळस विश्वास ठेवून चालते आहे जे व्हायचे ते होईल... ती माझी काळजी घेत आहे ह्या विश्वासाने पुढे जाते आहे नाहीतर.. झक मारली आणि इथे आले असे वाटू शकते.

आजचा दिवस खूप adventurous झाला. सातपुडा पर्वताची कितीतरी रुपे, इथे राहणारे प्रेमळ लोक. त्यांच्या सहज वागण्यामुळे कितीतरी वेळा मनातल्या मनात खजिल व्हायला होते..

आतापर्यंत भेटलेल्या परिक्रमा कर्मी मध्ये 80 टक्के लोक मराठी भेटले ते सुद्धा पुणे मुंबई नागपूर नगर ह्या भागातले. बाकी सगळे UP आणि MP मध्ये. South Indian कोणीही नाही.

आता महाराष्ट्रातील लोकांचा आणि नर्मदे चा काहीच direct संबंध नाही. मग इतके लोक कसे काय? यावर मी काढलेले अनुमान.

इथे बहुतेक सर्व एकटे (महिला सुद्धा) येतात, त्यांना पूर्ण 4 महीने परिक्रमा करायची असते. एकेक आश्रमात लोक 2,3 दिवस सुद्धा राहतात.

प्रत्येकाची काहीना काही तरी बॅकग्राऊंड आहे आणि त्यांना घरापसुन लांब रहायला आवडेल.

दुसरा ग्रुप आहे सन्यासी लोकांचा, ह्यात सुद्धा महिला आहेत. हे लोक वेग वेगल्या ठिकाणी जात असतात, त्यांचे कॅलेंडर ठरलेले असते. बरेचसे नागा साधु असतात.

आपल्या समाजात सर्वांचेच लग्न आणि संसार होत नाहीत. काही संसारात पडून पस्ताव तात.

अशा लोकांना आपल्या पारंपरिक चौकटीत रहावेसे वाटत नाही, मग जायचे कुठे.?

परिक्रमा हा खूप चांगला ऑप्शन आहे.

इथे आत्मपरीक्षण करण्याची संधी मिळते.

दुसऱ्या साठी काही करण्याची संधी मिळते. कोणीतरी passive listener मिळतो. कोणाचे तरी पालकत्व मिळते.

हे सर्व आपल्या हिंदू संस्कृती त असणाऱ्या परिक्रमा च्या परंपरेने शाक्य होते.

मला तरी ही परंपरा अशीच चालू रहावी असेच वाटले. मात्र ह्याचे पावित्र्य जपले पाहिजे. ह्याकडे enjoyment म्हणुन लोकांनी कधीच पाहू नये..

Day12

सेमलट ते धावड

आज आम्ही महाराष्ट्रात पोहोचलो.

शूल पानी च्या जंगलातील आज तिसरा दिवस..

फक्त दुसरा दिवस परीक्षा घेणारा होता.

जशी महाराष्ट्राची बॉर्डर आली तशी नर्मदा एकदम अरुंद झाली

एका आदिवासी च्या घरात राहण्याची सोय होती. त्यांची भाषा पावरी.

ईथे अजूनही निमाड़ भाषेचा प्रभाव दिसतो. मध्यप्रदेश राज्यातील काही भागाला निमाड़ म्हणतात. म्हणजे नीम झाडांच्या आड, आणि बोली भाषा निमाड़. ह्यातील बरेच शब्द मराठीत सुद्धा आहेत त्यामुळे ती पटकन समजते. आपण जसे. हो, होय म्हणतो तसे ते. होव म्हणतात. खूप गोड वाटते ते कानाला.

सेमलट ला एका सरपंच च्या घरात राहिलो होतो. खूप मोठे घर होते. ह्या परिक्रमेच्या निमित्ताने सातपुडा चे दर्शन झाले. सह्याद्री सारखे उंच कडे इथे दिसत नाहीत. Basalt चा खड़क ही फार दिसत नाही. सह्याद्री च्या कड़यांची शान काही वेगलीच आहे. इथे पिवळट पांढरी माती दिसते, आज सागाची झाडे खुप दिसली पण आता पानगळ सुरू आहे. खूप कोरडे कोरडे वाटते.

शूल पानी च्या जंगलात आता तसे भितीदायक वाटत नाही. पाहिल्या दिवशी तर मी एकटीच होते कुली च्या आश्रमात. मी आश्रमातील बाबा ला विचारले मी एकटी चालू शकेन का.. तर ते म्हणतात आत्ता तू officially जंगलात आहेस, एकटी आहेस, आता तूच ठरव तुला कसे वाटते ते. 😀

घूमरा ला जाताना छोटासा वाईट अनुभव आला तीन छोट्या मुलांचा, त्यांना पैसे हवे होते, कितीतरी वेळ मागे लागली होती. शेवटी तर म्हणाली आम्ही तुझी पर्स हिसकावून घेऊ. तेव्हा जराशी भीती वाटली होती. ह्या मुलांनी दगड वगैरे मारले तर काय? आश्रमात पोहोचल्यावर बऱ्याच जणांना ही तीन मुले भेटल्याचे समजले.

तिन्ही दिवस असा अनुभव येतो. लहान मुले डायरेक्ट पैसे मागतात. पण त्यांना पैसे मागायचे नसतात, काम करून मिळवायचे असतात हे समजत नाही. अशा कित्येक ठिकाणी वृद्ध लोकांना त्यांचे सामान उचलायला मदत लागते, तीव्र उतारावर हात धरावासा वाटतो अशा ठिकाणी ही मुले नसतात. पण मोठी माणसे मात्र असे पैसे मागत नाहीत. आश्रमाचे काम डोनेशन वर चालते, पण जेव्हा एखाद्या घरात मी जेवले तेव्हा आवर्जून पैसे दिले. काहींच्या मते असे पैसे देणे चुकीचे आहे.

बऱ्याच मुलांशी मी बोलण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांना खाऊ म्हणुन दाणे आणि फुटाणे आवर्जून दिले आणि गोळ्या बिस्किट खाउन दात कीड तात आणि प्लास्टिक चा कचरा होतो असे सांगितले.

प्लास्टिक च्या कचऱ्याच्या प्रश्न हळू हळू इथेही सुरू होणार आहे. मुले पैसे मागतात आणि दुकानातून चिप्स, शेव सारखी पाकिटे विकत घेतात. त्यांना वेलीच प्लास्टिक चे दुष्परिणाम सांगणे गरजेचे आहे..

आता उद्याचा पूर्ण दिवस नंदुरबार जिल्ह्यात.

Day 13

दावड़ी, खाप्परमल, भामणा, भीलगाँव, धड़गाँव

महाराष्ट्रत शिरल्या शिरल्या अपेक्षित सुखद अनुभव यायला सुरवात झाली.

दावड़ी पासून खाप्परमल ला पोहोचायला अडीच तास लागतात पूर्ण एक उंच पहाड़ चढून पलीकडे जायचे

खाप्परमल ते भामणा अन्तर दाखवले होते 7 किमी. प्रत्यक्षात ते 25 किमी सहज असावे, ते सुद्धा construction चालू असणारा घाट रस्ता. सगळीकडे दगड आणि मुरुम.

नशीब भामणा ला जेवणाची सोय चांगली होती.

त्याच्या पुढे भीलगाँव, ते होते 15 किमी. आश्रम शाळेचा पत्ता दिला होता तर तेथे आत जाऊ सुद्धा दिले नाही. सरपंच ना भेटलो तर त्यांनी इथे सोय होऊ शकत नाही असे सांगितले. आता दुपारी 3 वा आम्ही 22 किमी दूर असलेल्या धड़गाँव ला जायचे होते का? आमच्या पैकी काही जण कंटाळून (चिडून) पुढे चालू पडले.

आम्ही म्हणालो निदान शाळेच्या व्हरांड्यात आम्हाला झोपू द्या. किंवा एखादे मंदिर असेल, पार असेल तर तेथे आम्ही रात्र काढू. पण सर्व गोष्टींना नकारघंटा.

बर शेवटची बस 2 वा निघून गेली होती.

शेवटी आरोग्य खात्याच्या स्टाफ नी आम्हाला रहायला परवानगी दिली.

तेवढ्यात एक मोठी गाडी येताना दिसली, त्या मध्ये दोघे जण होते. त्यांना विनंती करून आम्हाला धडगाव ला जायची सोय झाली.

धड़गाँव चे आश्रम चालक सुदैवाने चांगले निघाले. आजची रात्र एका मंदिराच्या आवारात चौथर्यावर काढायची आहे.

परिक्रमेत प्रत्येक दिवस आणी प्रत्येक रात्र वेगला अनुभव देऊन जाते.

एकाही रात्री शांत झोप अशी लागल्याचे आठवत नाही.

कधी पाय खूप दुखतात,, खाली फरशी असेल तर पाठीला थंडी वाजते. कुठे पाणी कमी असते. कधी मांजरी, उंदीर आजूबाजूला असतात. 😀 गायी म्हशीचे गोठे असतातच शेजारी.. मला हया गोष्टी नवीन नाहीत. त्यामुळे फार काही वाटत नाही.

इथल्या प्रत्येक गावची तऱ्हा च वेगली. खाप्परमल गावात तर एकच खानदान राहते. एका माणसाने 7 लग्न केली आहेत आणि त्यांच्या 8-10 घरांचे मिळून गाव झाले आहे.. 😀

येथे वीज नाही, मोबाइल connectivity नाही, पण एवढा मोठा घाट रस्ता कशासाठी तयार करत आहेत काही समजले नाही.

आता उद्या पासून चा पूर्ण रस्ता हाइवे वरून जातो, नर्मदा लांब कुठे तरी आहे आणि रस्ता दुसरीकडे.

Day 14

धड़गाँव मोलगी वड़फल

धड़गाँव हे एक तालुक्याचे ठिकाण आहे आणि मोलगी ही आदिवासी लोकांसाठी बाजारपेठ.

अशा मोठ्या ठिकाणी बस किंवा जीप ने जायचे असे आधीच ठरविले आहे.

कारण ट्रॅफिक मध्ये वजन पाठीवर घेऊन धूर आणि धूळ खात चालण्यात काहीच साध्य होत नाही. नर्मदा नदी तर दिसत सुद्धा नाही. त्यापेक्षा आदिवासी लोकांशी बोलताना मजा येते.

मोलगी ला एक मोठा रस्ता भर छोटी छोटी दुकाने आणि हातगाडी वर वस्तु विकतात. साबण पीना टिकल्या मसाले भाजी आणि लोखंडी हत्यारे (खुरपी, फावड़े वगैर, पण तवे आणि कढ़ाई नाही दिसले. ह्याचा अर्थ ते aluminiumची भांडी वापरतात)

तुरीच्या शेंगा खूप होत्या विकायला.

जेवताना पण तुरीचे दाणे, वांगे आणि टोमॅटो अशी मस्त भाजी खाल्ली.

Spurious products हा एक वेगलाच विषय आहे.

मोलगी च्या पुढे जंगलातून रस्ता आहे. दोन्ही बाजूंना सागाची झाडे आणि इतर झुडुपे, खूप छान landscape.

संध्याकाळी अचानक पाऊस सुरू झाला. आज पहाटे सुद्धा पाऊस पडतोय.

वड़फल च्या आश्रमात किती तरी दिवसांनी बंद खोलीत ब्लँकेट घेऊन झोपायला मिळाले...

आणि सकाळी पाऊस पडतोय आता दिवसभर काय होणार याचा विचार करतेय.

आश्रमा समोर देव नदी चा किनारा आणि त्याचा पलीकडे गुजराथ राज्य.

Day 15

वड़फल ते माथासर

आजचा दिवस परीक्षेचा होता. इतके दिवस काय परिक्रमा केली, किती चुकार पणा केला त्याचा हिशोब. आदल्या रात्री पासूनच पावसाला सुरुवात झाली होती. तरी सकाळी निघालो.

पाऊस थांबायची काही लक्षणे दिसेना.

एकूण 20 किमी चाललो.

आजचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व जण फारशी ओळख नसताना एकत्र निघालो आणि शेवटापर्यंत एकत्र होतो. तेच बरे झाले नाहीतर एकटे चालणे अशक्य झाले असते.

त्यातून मध्य प्रदेश मध्ये लाड करून घ्यायची इतकी सवय झाली होती की खडूस महाराष्ट्र आणि मतलबी गुजराथ राज्यात खडतर प्रवास चांगलाच जाणवाला.

वड़फल च्या महाराजांनी पढवून पाठवले होते तिकडे तुम्हाला बोळवण करण्याचा प्रयत्न करतील, तुम्ही फर्म रहा.

सुदैवाने सर्व सुरळीत पार पडले. शूल पानी तील जंगल सम्पत्ति विशेषत सागाची झाडे पाहून बरे वाटले. वन खात्याने चांगले जपले आहे जंगल. कुठेही उगाच वृक्ष तोड़ दिसली नाही. खरे तर वन खात्याचे लोक, चेक पोस्ट सुद्धा कुठे दिसले नाही.

Day 16

माथा सर ते गोरा वस्ती

माथा सर खरोखरीच नावाप्रमाणे उंच आहे. सातपुड्याच्या कुशीत, साग आणि बांबू च्या झाडांनी वेढलेले. येथील आदिवासी तूर पिकवतात. आताच एक पीक येऊन गेले जे गावरान होते आणि आता नवीन झाडे उगवली आहेत ती हाइब्रिड असतात. चवीत फरक लगेच लक्षात येतो. माथा सर ला रात्री तुरीचे फोडणीचे वरण फक्त लाल मिरची आणि कढीपत्ता घालून केलेले, थेट पुरणाच्या आमटी सारखे चवीला लागत होते.

माथा सर ते झरवानी साधारण 10 km चे अन्तर खास landscape आहे. खूप देखणे जंगल आहे, थोडे पुढे आल्यावर मात्र विरस झाला डांबरी रस्त्याचे बांधकाम बघून. प्रत्येक जंगलात मोठे रस्ते कशासाठी? जर लोक राहातच नसतील तर... मध्य प्रदेश पासून सुरू झालेले हे जंगल गुजराथ च्या गोरा गाव पर्यंत चा stretch बघुन मन भरून येते. आता मोठ्या रस्त्यांचा वापर नक्की कसा होईल ह्याचा विचार करून उदास वाटले. आधीच जंगलाचा मोठा भाग पाण्याखाली गेला आहे आणि आता मोठे रस्ते....

सकाळी चूल पेटवली होती त्यात चक्क सागाचे लाकूड होते बरे का..

अती परिचयात अवज्ञा.... अजून काय

गोरा गाव आता चांगलेच प्रसिद्ध झाले आहे Statue of Unity मुळे.

इथल्या आश्रमातून पुतळ्याचे मागील बाजूचे दर्शन होते. पुढील बाजूस परिक्रमा कर्मी जात नाही कारण नदी क्रॉस होते...

दोन दिवस कशामुळे इतका पाऊस पडला काही कारण समजले का...

Climate change.. असे म्हणुन फक्त सोडून दिले तर महागात पडेल फार.

असेही interpretation

आतापर्यंत मध्य प्रदेश आणि नंदुरबार जिल्ह्यातील काही भाग, येथे corona काहीही नामोनिशाण नाही. लोक मास्क वापरत नाहीत. इथे पेशेंट सापडले नाहीत, काहीच नाही.

आता गुजरात मधील गोरा गाव येथे काही लोक मास्क लावून फिरत आहेत.

आजकाल माझी साधू आणि बाबा लोकांशी मैत्री झाली आहे अगदी wa number शेयर करण्या इतपत.

हे बाबा कसे बनतात, कसे वागतात, काय करतात ते कधीतरी लिहीन पण

Corona बददल चा एक वेगळाच समज कानावर पडला.

वो ऐसा है कि यह सब मोदी का किया करा है.

पूछो कैसे

कैसे?

अब देखो सुप्रीम कोरट ने तो राम मंदिर के पक्ष में फैसला दे दीया

अब मंदिर बनाना बाकी है। अब यह लोग कुछ बाधा ना डाले इसलिए सबको जबरदस्ती घरमे बिठाया है लोक डाउन का नाम देके..... 😀

Day 17

गोरा वस्ती ते राजपिपली

आता मी इथे कशी येऊन पोहोचले, मध्ये कुठे कुठे गेले, काय काय केले ते सर्व राहू दे माझ्याच कडे. 😀

मांगरोल हून निघाले खरी... नक्की कुठे पर्यंत जायचे, कुठे थांबायचे की माझ्या परिक्रमा नीती प्रमाणे high way आला की बस ने जायचे हे सर्व डोक्यात ठरलेले असूनही जर गावांची, अंतरांची नीट माहिती नसेल तर काय होते त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे आजचा दिवस.

गोरा पासून आता नर्मदा चा समुद्र होण्यात किती अन्तर असेल ह्याची फक्त ऐकीव माहिती होती. Baroda ला राहणाऱ्या माझ्या मावशीला सुद्धा इतक्या छोट्या गावांची नावे माहित नाही.

राज पीपली नावाची बहुदा दोन गावे आहेत. सकाळी राज पीपली ला पोहोचले भगवा कुर्ता घेण्यासाठी... पण शिवलेला कुर्ता कुठेच मिळाला नाही, मग पोहोचले मांगरोल ला. तेथील तपोवन आश्रम खूपच छान, मैय्या च्या काठावर, खूप प्रशस्त, सकाळचे जेवण ही छान.

जेवण झाल्यावर खरे तर time pass करता आला असता पण अती उत्साह नडला. कधी कधी माहिती देणारे सुद्धा अती उत्साहाने माहिती देतात, त्याआधारे निघाले सहराव ला. पूर्ण खडीचा रस्ता. लोक थांबून विचारात होते एकटी कुठे चालले आहे?

खरे तर सहराव ला सुद्धा 5 वाजता थांबता आले असते पण निघाले जायला राजपिपली ला. बस मध्ये मी एकटीच.

आज चालत असताना केळीच्या बागा खूप दिसल्या आणि थोडे पुढे आल्यावर बसमधून वेफ़र्स चे प्रॉडक्शन आणि बिक्री चे ढाबा सारखी दुकाने. फार आवडली ही कल्पना. शेतकऱ्यांनी च आपल्या produce चे value addition करायचे. व्वा.. शिकण्यासारखे आहे

पोहोचे पर्यंत वाजले होते 6.30.

कंडक्टर आणि ड्राइवर दोघांशी गप्पा मारायला सुरुवात केली आणि समजले आता अंकलेश्वर ला जायला बस 8 वा मिळेल आणि ती पोहोचेल 10 वा. त्यानंतर आश्रम शोधायचा... अरे बापरे.. मोदींचा गुजराथ असला म्हणुन काय झालं..

शेवटी ड्राइवर आणि कंडक्टर दोघेही म्हणाले दीदी हमारी बात मानलो और यही रुक जाओ राजपिपली.

पण इथे आश्रम कुठे आहे?

तर म्हणाले इथे एक मोठे देऊळ आहे तिथे सोडतो, असे म्हणुन त्यांनी मला बस ने देवळाच्या दारात सोडले.

आत देवळात गेले तर आरती चालू होती, तेथील व्यवस्थापकांना सांगितले मला रहायचे आहे. मी एकटी आहे हे पाहून ते थककच झाले, लगेच मला खोली घेण्याची व्यवस्था केली माझे आधार कार्ड बघुन.

मला सांगितले देवळाचे दार 8 वा बंद होईल आणि सकाळी 6 वा उघडेल.

रूम चे चार्जस काय? तर काही नाही..

उलट माझा पुढचा प्रवास आखून दिला, कशी जा, कोणती बस घे वगैरे. वर म्हणायला विसरले नाही

मैंने तो बता दिया आगे आपकी मर्जी... 😊

तर आजची रात्र माता हारसिद्धि च्या देवळात.

आपण देवळात जातो तेव्हा बाजूला कडेने ज्या खोल्या असतात त्या नेमके कोण वापरते मला कधीच माहीत नव्हते. मला वाटायचे पुजारी लोक रहात असावेत.

आज कळले त्याचा नेमका उपयोग.

Temple institution बददल खरे तर मला काहीच माहित नाही..

आता ह्याचा अभ्यास करणे आले.

मैय्या खरेच काय काय करून घेत आहे माझ्याकडून.

आज सकाळी च काही जणांशी बोलत होते कोणाचे कसे यायचे ठरले परिक्रमा साठी.

माझी गोष्ट सर्वात छोटीशी. आधी चौकशी केली होती तेव्हा कळले की corona मुळे परिक्रमा बंद आहे.

अचानक एक दिवस wa वर मेसेज आला रेवा नावाची शॉर्ट फिल्म बघ परिक्रमा वरची.

तेव्हा मी मोठ्यांदा म्हणाले फिल्म काय बघायची स्वतः च जाऊन बघायचे. तर माझा मित्र म्हणाला बघ माझ्या ओळखीचे 6 जण जात आहेत 6 दिवसानी, तुला जायचे तर जा. आणि मी जायचे ठरवले.

मैय्या ने इतक्या तातडीने बोलावले.. नक्की काय हेतू असेल बरे?

Day 18

राजपिपली, अंकलेश्वर, हसोट, हनुमान टेकडी, बिलमेश्वर

गोरा वस्ती पासून बघते आहे सर्वदूर विस्तीर्ण शेती, उस केळी, कापूस, चणा, भुईमूग ही मुख्य पिके.

पाण्याची काही कमीच नाही.

हनुमान टेकडी येथे खूप मोठा आश्रम आहे. सर्वांसाठी, आजूबाजूच्या लोकांमुळे मोठे अन्न छत्र चालते येथे. एकूणच मध्य प्रदेश आणि आता गुजराथ मध्ये शनिचे देऊळ दिसते. महाराष्ट्रात मला शनीची खूप देवळे आहेत असे वाटले नाही.

इथे आल्यावर तिथल्या व्यवस्थापकांनी छान स्वागत केले, लगेच प्रसाद घ्या असे सांगितले. नवग्रह, मारुती आणि शनिचे देऊळ पाहता पाहता अचानक मन भरून आले (खरे तर भावनाविवश होण्यासारखे काही विशेष घडले नव्हते.... तरी सुद्धा..) psychologist सांगू शकतील ह्या मागचे कारण.

माझ्या मनात विचार सुरू झाले, नक्की काय होते आहे मला?

इतक्या लोकांचा तिथे मेळा होता, माझ्या अंगावरचे पांढरे कपड़े पुरेसे होते मला त्यात सामावून घेण्या साठी. मी कोण, माझे नाव काय, जात काय... कसलीही चौकशी नाही, फक्त एकच समान दुवा परिक्रमा कर्मी. त्यामुळे एवढे अगत्य आणि आपुलकी.

माझ्या upbringing प्रमाणे मी मुळीच भक्त नाही, कोणती पूजा अर्चा आमच्याकडे होत नाही, उलट आम्ही कर्मकांड करत नाही असे अभिमानाने सांगण्याकडेच आमचा कल.

परिक्रमेची सुरवात करताना मी हा असाच attitude ठेवला होता.

मी परिक्रमा उचलली नाही (गुरुजी काही विधि करतात ओंकारेश्वर येथे) मी प्लास्टिक च्या बाटलीत पाणी भरून घेतले नाही, रोज मैय्या ची पूजा पण केली नाही. बाकीचे पूजा करायचे तेव्हा शांतपणे बघत असे, आरती ऐकत असे आणि प्रसाद नक्की घेत असे. कोणी विचारले तर मोकळे पणाने सांगत असे. माझी भक्ती माझ्या मनात आहे. मी मैय्या ला भेटायला आले आहे. मला तिची काळजी आहे म्हणुन तिची अवस्था डोळसपणे बघत आहे. ह्या विषया वर मी स्थानिक लोकांशी बोलण्याचा प्रयत्न केला. त्याबद्दल लिहिले सुद्धा.

तर सांगायचा मुद्दा हा की मी बाकी सर्व भक्त सारखी वागत नव्हते म्हणुन माझा कोणी राग केला नाही, मला कोणी एकटे पाडले नाही उलट आम्ही सर्वच एकमेकांची काळजी घेत होतो, मदत करत होतो. कोणाला पायाला चोळायला सरसू चे तेल दे, औषधे दे वगरे.

मी परिक्रमा करते आहे एवढे कारण पुरेसे होते मी त्या गटाची सदस्य होण्यासाठी.

किती प्रकारचे लोक भेटले मला, सुशिक्षित महिला पुरुष, ग्रामीण भागातील लोक प्रत्येकाची रोज पूजा आणि आरती करण्याची पद्धत वेगळी.

एक ग्रुप होता मध्य प्रदेश मधील खरगोन जिल्ह्यातील 20 - 25 जणांचा. सर्व साधारण अशिक्षित म्हणता येतील असे, त्यांची आरती नंतरची घोषणा विशेष लक्षात राहिली. ते म्हणायचे

सत्य की जय हो

सद्गुणों की जय हो

सर्व धर्म की जय हो.

किती छान वाटायचे हे ऐकून.

सर्व बायका छान बोलायच्या माझ्याशी. आवर्जून चौकशी करायच्या.

कितीतरी साधु आणि बाबा भेटले. त्यांच्याशी खूप मोकळे पणी बोलता आले.

चक्क त्याचे विचार माझ्या common sense ला पटणारे होते.

ह्या विषयावर एक वेगली पोस्ट लिहिता येईल.

मला वाटले आपली मंदिर संस्कृतीधार्मिक परंपरा ह्याचे कार्य जाणून घेण्याची पुन्हा गरज आहे.

प्राचीन मंदिरा च्या architecture बददल आपण बोलतो पण ह्या मंदिरात नक्की काय कार्य चालू असायचे ह्या बददल फारसे बोलले जात नाही. आपण फुटीर शक्ति, अगदी लव जिहाद सारख्या गोष्टी वर हिरीरीने बोलतो पण इतक्या positive ऊर्जा असणाऱ्या, आपल्याला एकत्र ठेवणाऱ्या गोष्टी बददल आपण फार बोलत नाही.

आपल्याकडील वारी, परिक्रमा, यात्रा ह्या खूप मोठ्या संधी आहेत वेगले प्रदेश बघण्यासाठी, निरनिराळ्या लोकांना भेटण्यासाठी. ह्या सर्व गोष्टी चांगल्या स्वरुपात revive झाल्या तर बरे असे वाटले.

Day19

Bimleshwar ते मीठीतलाई

जवळजवळ 70 km चा समुद्रातून प्रवास. काहींना adventurous वाटले, काही शांत बसुन होते

ह्या समुद्र प्रवासाची आयडिया अशी आहे की

परिक्रमा करत असताना नर्मदा नदी क्रॉस करायची नाही म्हणुन ती जिथे समुद्राला मिळते त्याच्या पलीकडून समोर च्या तटावर जायचे.

ओंकारेश्वर ही नर्मदे ची नाभी, bimleshwar हे चरण अशी दक्षिण तटावर चा प्रवास संपला आता उत्तर तटावर चा प्रवास सुरू होतो गुजराथ पासून मध्य प्रदेश पर्यंत.

मीठीतलाई हे नाव जितके गोड, तेवढेच त्याचे दर्शन not so appealing.

Motor boat लागते तीच मुळी सीमेंट च्या बांधलेल्या jetty वर त्यावरून चालत जायचे जवळजवळ 1 km, समुद्राच्या पाण्याचा स्पर्श सुद्धा होत नाही. आजूबाजूला मोठ्या मोठ्या इंडस्ट्रीज. Spiritual असे काही नाहीच तेथे.

मीठीतलाई भरूच सूरत pune

मीठीतलाई ह्या नावातच फक्त गोडवा आहे बाकी तो सर्व industrial area आहे. Chemical, fertilizer आणि इतर कारखाने असलेला. अर्थात येथे नर्मदे च्या ऐवजी एक एक कारखान्याची प्रदक्षिणा होते. भाविक मुकाट्याने चालत राहतात आणि पुण्य गोळा करत राहतात. इथे मोटर बोट ने पोहोचणे सुद्धा धोकादायक आहे. इतकी माणसे खचून भरलेली असतात, एक मोट्ठी लाट बोट सहज उलटवून टाकेल.

असो.. आपला देश फक्त आणि फक्त श्रद्धेवर चालतो.

लाडू आख्खा पूर्ण खाल्ला किंवा थोडे थोडे तुकडे करून खाल्ला तरी गोडच लागतो. त्याप्रमाणे परिक्रमा टप्प्या टप्प्यात करता येते, ह्याचा फायदा घेऊन परत यायचे ठरविले.

मी भक्त असेन किंवा नसेन, मैय्या ची कायम कृपा होती माझ्यावर.

कधीही मला एकटे वाटले नाही, कसलाही त्रास झाला नाही. तुम्हाला फक्त तुमचे कपड़े बरोबर न्यायचे असतात, बाकी ताट वाटी, blanket सुद्धा तुम्हाला आश्रमात मिळू शकते.

ही परिक्रमा आश्रमाचे संचालक आणि देणगीदार ह्यांच्या शिवाय होऊच शकत नाही.

लोकांचा पाठींबा खूप मोठी शक्ति देऊन जातो.

आश्रमात रात्रीचे जेवण हमख़ास मिळते, सकाळी नाश्ता देण्याची पद्धत नाही आणि जेवायच्या वेळी तुम्ही दुसऱ्या आश्रमात पोहोचला तर दुपारचे जेवण मिळू शकते.

दाणे आणि फुटाणे अशा वेळेस खूप पोटाला आधार देतात. मी असे किलो किलो फस्त केले आहेत, त्यामुळेच लवकार अन्तर पार करू शकले. रस्त्यात तुम्हाला चहा हवा तेवढा मिळू शकतो.

परिक्रमा and it's economics असा interesting शोध निबंध सहज लिहिता येईल इतके ह्याचे potential आहे. कितीतरी साधु लोक ही परिक्रमा करतात, त्यांचे कूळ विचारायचे नसते, ही परिक्रमा लोक 3, 3 वर्ष सुद्धा करू शकतात. एकदा करून संपली की दूसरी तीसरी... कितीही वेळा.. ह्या चा कुठेही हिशोब नसतो. त्याअर्थी ही परिक्रमा समाजातील सर्व घटकांना सहज सामावून घेते, तुम्हाला वाटले तर तुम्ही आश्रमात सेवा देण्यासाठी थांबू शकता. बरे ह्या मध्ये लक्षात येण्यासारखे कोणतेही गैरकृत्य दिसले नाही. Crime रेट शून्य आहे असे म्हटले तरी चालेल.

सरकारने ह्याचे पावित्र्य जपण्याची काळजी घ्यावयास हवी होती. ही परिक्रमा 15 वर्षापूर्वी केली असती तर अजून उत्कट पणे झाली असती. अजून पुढे 10 वर्षात ह्याचे commercial स्वरूप होणार ह्यात काहीच शंका नाही.

मला भेटलेल्या लोकांची परत भेट होण्याची काहीच शक्यता नाही पण त्या सर्वांची आठवण कायम राहील, माणूस म्हणून मला ह्या सर्वांनी समृद्ध केले आहे.

बघू परत उरलेली परिक्रमा करायची संधी कधी मिळते ती.

तोपर्यंत अतिशय विनम्रतेने सर्वांना नमस्कार.

Iti Anagha

27th Nov 20 - 17th Dec 20